**राज्य शासकिय अधिकारी व कर्मचारी यांचे वैद्यकिय तपासणी धोरण.**

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय, क्रमांकः वैतधो- २०२१/प्र.क्र.३७/आरोग्य-३

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : २२ एप्रिल, २०२२.

**वाचा -**

1. **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक-एमएजी १०९८/प्र.क्र.२२०/आरोग्य-३, दिनांक- ०१ डिसेंबर, १९९८.**
2. **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक-एमएजी १०९८/प्र.क्र.२२०/आरोग्य-३, दिनांक- ३१ ऑगस्ट, २००६.**

**प्रस्तावना :**

शासकिय अधिकारी /कर्मचारी यांना वयाच्या ५०/५५ व्या वर्षापलीकडे / अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षानंतर सेवेचे पुर्नविलोकन करुन मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्याबाबतची एकत्रित कार्यपध्दती सामान्य प्रशासन विभाग,दि. १०.०६.२०१९ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार शासकिय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सेवेचे पुर्नविलोकन करताना काही निकष नमूद केले आहेत. त्यात शारिरीक क्षमता / प्रकृतिमान तपासणे हा महत्वाचा निकष आहे. अधिकारी/कर्मचाऱ्यांची शारीरीक क्षमता / प्रकृतिमान योग्य नसल्यास त्याचा शासकिय कामकाजावर विपरित परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दिनांक ०७.०२.२०१८ सोबत दिलेल्या कार्यमूल्यमापन अहवालातील नमुन्यातील भाग-३ (प्रतिवेदन अधिकाऱ्यांने लिहावयाचा मूल्यमापन अहवाल ) यातील मुद्दा क्र.७ मध्ये, प्रकृतीमान (State of Health) यासमोर (उत्कृष्ठ / चांगला/चांगले नाही) अशी वर्गवारी दिलेली आहे. सबब, प्रतिवेदन अधिकाऱ्याने संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालात प्रकृतिमान संदर्भात शेरे लिहिण्यापूर्वी संबंधित अधिकारी /कर्मचारी यांचे वैद्यकिय तपासणी अहवाल पाहून शेरे लिहिल्यास ते वास्तविकतेला धरुन राहतील. त्याअनुषंगाने विभागाच्या दि.०१.१२.१९९८ व दि.३१.०८.२००६ या शासन निर्णयानुसार ४५ अथवा त्यावरील वयोगटातील रु.१२०००-१६५०० (जुनी वेतनश्रेणी ३७००-५०००) व त्यावरील वेतनश्रेणी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या त्यांच्या सोयीच्या ठिकाणी वैद्यकिय तपासण्या २ वर्षातून एकदा करुन त्याच्या प्रतिपूर्तीची रक्कम रु.५०००/-

इतक्या रकमेच्या मर्यादेत देय होती. सदर सुविधा ठराविक एका वेतनश्रेणी व त्यावरील असलेल्या वेतनश्रेणीसाठी असून सदर सुविधा राज्यातील शासकीय सेवेत कार्यरत सर्व शासकिय अधिकारी व कर्मचारी यांना अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना प्राप्त होत असलेल्या सुविधेप्रमाणे समान वैद्यकिय चाचण्या करण्याची सुविधा लागू करावयाची असल्याने निर्णयात सुधारणा करणे किंवा नविन धोरण तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. दि.३१ मार्च, २०२२ रोजी झालेल्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

## शासन निर्णय:-

राज्यातील शासकीय सेवेत कार्यरत असलेले वय वर्ष ४० ते ५० या वयोगटातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना दोन वर्षातून एकदा व वय वर्ष ५१ व त्यावरील वयोगटातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना दरवर्षी वैद्यकीय तपासणी अनुज्ञेय राहील. वैद्यकिय तपासणीकरीता रु.५०००/- याप्रमाणे इतक्या रकमेपर्यंतच्या खर्चाची प्रतिपूर्ती प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांना अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्यातील वय वर्ष ४० पुढील कार्यरत शासकिय अधिकारी व कर्मचारी यांना अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना प्राप्त होत असलेल्या सुविधेप्रमाणे समान वैद्यकिय चाचण्या सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ येथे नमूद करण्यात आलेल्या चाचण्या सर्व शासकिय वैद्यकिय महाविद्यालये व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त आरोग्य संस्थांमार्फत करण्यास मुभा राहील. यापैकी काही चाचण्या उपरोक्त संस्थामध्ये उपलब्ध नसल्यास सदर चाचण्या बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करुन देण्यात येण्याची कार्यवाही आयुक्त, आरोग्य सेवा यांच्याकडून करण्यात येत आहे. यासंदर्भात स्वतंत्रपणे सूचना निर्गमित करण्यात येतील.

३. सदर वैद्यकिय तपासणी करताना खालील सुचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

३.१ शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.१६.१२.२०१४ अन्वये भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांना ज्या वैद्यकिय चाचण्यां करण्यास सहमती दिली आहे, त्याप्रमाणेच राज्य शासकिय सेवेतील सर्व कार्यरत शासकिय अधिकारी व कर्मचारी ज्यांचे वय ४० वर्षे व त्यापेक्षा अधिक वयोगटातील कर्मचाऱ्यांना सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्व वैद्यकिय तपासण्या लागू राहतील. सदर वैद्यकिय चाचण्यांसाठी आवश्यक असलेली रक्कम

